admn16-17


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

**आयएस्ओ ९००१ : २००८ मानांकित संस्था**

**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.**

**ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com** **दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.**

**वेबसाईट : www.mcaer.org** **फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.**


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/१५१६/११०४ दि. १२ मे,२०१६

## परिपत्रक

**विषयः- बी.एफ.एससी. अभ्यासक्रमाच्या थेट दुसऱ्या वर्षाची प्रवेश प्रक्रिया २०१६-१७ - वेळापत्रक सुधारीत करणेबाबत.**

मत्स्य अभियांत्रिकी पदविकाधारक विद्यार्थी बी. एफ. एससी. हया पदवी अभ्यासक्रमाच्या थेट दुसऱ्या वर्षात प्रवेशास पात्र आहेत. याबाबतची प्रवेश प्रक्रिया दि. २ मे, २०१६ पासून सुरु झालेली असून ऑनलाईन प्रवेश अर्ज भरावयाचा अंतिम दिनांक १० मे,२०१६ आहे.

तथापि, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली अंतर्गत मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाचा निकाल अद्याप जाहीर करण्यात आलेला नाही. याबाबत अधिष्ठाता (कृषी), डॉ. बासाकोकृवि, दापोली यांनी मुदत वाढवून देण्याबाबत त्यांच्या दि.१०/५/२०१६ च्या पत्राद्वारे विनंती करण्यात आली होती.

यास्तव बी. एफ. एससी. अभ्यासक्रमाच्या थेट दुसऱ्या वर्षाच्या प्रवेशाचे वेळापत्रक खालीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे.

| अ. क्र. | कार्यक्रम | पूर्वीचा दिनांक | सुधारित दिनांक |
|---|---|---|---|
| १. | ऑनलाईन प्रवेश अर्ज भरावयाचा अंतिम दिनांक | १०/०५/२०१६ | २५/०५/२०१६ |
| २. | उमेदवाराने निवडलेल्या प्रवेश अर्ज स्वीकृती केंद्राकडे अर्जाची मुद्रित प्रत प्रदानाच्या पुराव्यासह (छायाप्रत) व कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रती प्राप्तीचा अंतिम दिनांक | १४/०५/२०१६ | ३०/०५/२०१६ |
| ३. | केटीपीएल व कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर पहिल्या व थेट दुसऱ्या वर्षास प्रवेशासंदर्भात वर्षनिहाय अंतरिम गुणवत्ता यादीची प्रसिध्दी. | १७/०५/२०१६ | ०१/०६/२०१६ |
| ४. | तक्रार नोंदणीचा अंतिम दिनांक | २०/०५/२०१६ | ०४/०६/२०१६ |
| ५. | केटीपीएल व कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर पहिल्या व थेट दुसऱ्या वर्षास प्रवेशासंदर्भात वर्षनिहाय अंतिम गुणवत्ता यादीची प्रसिध्दी. | २३/०५/२०१६ | ०७/०६/२०१६ |
| | **थेट दुसऱ्या वर्षासाठी प्रवेश फेऱ्या-** | | |
| ६. | (i) पहिल्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी. | २५/०५/२०१६ | ०९/०६/२०१६ |
| | (ii) रिपोर्टिंगचा अंतिम दिनांक | २७/०५/२०१६ (सायं. ५.३० पर्यंत) | ११/०६/२०१६ (सायं. ५.३० पर्यंत) |
| ७. | (i) दुसऱ्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी. (रूपांतरासह) | ३०/०५/२०१६ | १४/०६/२०१६ |
| | (ii) रिपोर्टिंगचा अंतिम दिनांक | ०२/०६/२०१६ (सायं. ५.३० पर्यंत) | १७/०६/२०१६ (सायं. ५.३० पर्यंत) |

| अ. क्र. | कार्यक्रम | पूर्वीचा दिनांक | सुधारित दिनांक |
|---|---|---|---|
| ८. | जागेवरील प्रवेश फेरीसाठी रिक्त जागांच्या तपशिलाची प्रसिध्दी | ०४/०६/२०१६ | १९/०६/२०१६ |
| ९. | जागेवर प्रवेश फेरी (**परिशिष्ट 'एम'** येथील कार्यपध्दतीनुसार) | ०६ ते १०/०६/२०१६ | २१ ते २५/०६/२०१६ |
| १०. | दुसऱ्या वर्षाचे वर्ग सुरु होण्याचा दिनांक | ०१/०६/२०१६ | १६/०६/२०१६ |

उक्त सुधारीत वेळापत्रकाची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**स्वाक्षरीत/-**
**महासंचालक**

प्रति,

कुलसचिव / अधिष्ठाता (कृषी) / सहयोगी अधिष्ठाता (निकृशि), .बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी

यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी लवकरात लवकर मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाचा निकाल जाहीर करून कृषी परिषद कार्यालयास अवगत करावे. तसेच कृषी विद्यापीठाच्या, मत्स्य अभियांत्रिकी पदविका विद्यालयाच्या सूचना फलकावर तसेच संकेतस्थळावर सदर परिपत्रकास प्रसिध्दी द्यावी.

प्रतः-

१. मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., शॉप १ व २, राधाकांत को-ऑप हौसिंग सोसायटी, रामबाग कॉलनी, कृष्णा हॉस्पीटलसमोर, पौड रोड, पुणे ४११ ०३८

यांना सूचित करण्यात येते की, सदरचे परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करावे व सुधारीत वेळापत्रकानुसार प्रवेश प्रक्रिया राबवावी.

३. मे. जे. डी. आय. एन. सॉफ्ट, आरएच-७, प्लॉट क्र. ६१, सेक्टर क्र. १६, पीसीएनटीडीए, चिखली, पुणे ४११ ०१९.

यांना सूचित करण्यात येते की, सदर परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.